विभागीय पुनर्विलोकन समिती स्थापन करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन निर्णय क्रमांकः आस्था २०१८/प्र.क्र.३३ /रेशीम कक्ष
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : १२ एप्रिल, २०१८

वाचा :

१) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरसी-१०८५/१०२९/४३/१५, दिनांक १२.५.१९८६

२) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक विपुस-१०९२/प्र.क्र.२०/९२/१५, दिनांक १८/१०/१९९३.

शासन निर्णय : -

वस्त्रोद्योग विभागातील रेशीम संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नागपूर या संचालनालयाच्या अधिनस्त राजपत्रित अधिकाऱ्यांच्या सेवानिवृत्तीपूर्वी वयाच्या ५०/५५ वर्षापलीकडे किंवा अहर्ताकारी सेवेच्या ३० वर्षाच्या सेवेनंतर शासकीय सेवेत पुढे चालू ठेवण्यासाठी पात्रापात्रता अजमावण्याच्यादृष्टीने **पुनर्विलोकन** करून शिफारस करण्याकरिता खालीलप्रमाणे विभागीय पुनर्विलोकन समितीची स्थापना करण्यात येत आहे.

अ) मा. सचिव / प्र.स. /अ.मु.स. (वस्त्रोद्योग)	- अध्यक्ष
ब) उपसचिव / सहसचिव (वस्त्रोद्योग)	-सदस्य
क) संचालक (रेशीम)	- सदस्य
ड) अवर सचिव (रेशीम)	- सदस्य सचिव

२. सदर शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक, दिनांक १८ ऑक्टोबर, १९९३ च्या अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०४१३१११८०७१३०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ashish
Anaclet Lopes

Digitally signed by Ashish Anaclet Lopes
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co-Operation Marketing And Textiles Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=97c1663938db95bf4b157b5906fb45b17fdf64e8db800c9618de046d6e51497c, serialNumber=4c69f8b7f13f76b97aa93b0d155291c61823c6e1d678a555f6eb04d1a38750cf, cn=Ashish Anaclet Lopes
Date: 2018.04.13 11:19:08 +05'30'

(आ.अ. लोपिस)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. राज्यपाल यांचे खाजगी सचिव.

२. मा. मंत्री (वस्त्रोद्योग) / मा. राज्यमंत्री (वस्त्रोद्योग) यांचे खाजगी सचिव.

३. मा. सचिव (वस्त्रोद्योग), यांचे स्वीय सहायक.

४. उपसचिव, (वस्त्रोद्योग) यांचे स्वीय सहायक

५. संचालक, रेशीम संचालनालय, महाराष्ट्र राज्य, प्रशासकीय इमारत क्र.२, ६वा माळा,बी विंग, आयुक्त कार्यालय परिसर, सिव्हील लाईन्स,नागपूर-४४०००१

६. निवड नस्ती.